**सेवा निवृत्त / मयत आरोग्य सहाय्यक (पुरुष) या संवर्गातील कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतील ६ वे वेतन आयोगानुसार २४ वर्षानंतर व ७ वेतन आयोगानुसार २० वर्षानंतर दुसरा लाभ मंजूर करणेबाबत.**

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.आरोग्य/कार्या-२/आस्था-३/९१२/२०२६
अहिल्यानगर, दिनांक- २७/०८/२०२६

वाचा - १. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/ सेवा-३ दि.०२/०३/२०१९.
२. गठीत पदोन्नती निवड समितीचे मंजूर इतिवृत्त दिनांक- १४/०७/२०२६

शासनाचे संदर्भ क्रमांक १ चे शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणा-या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु ५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचा-यांना लागू केली आहे.

सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अटी व शर्ती याबाबत गठीत समितीने मान्य केलेल्या प्रस्तावाचा विचार करुन उपरोक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार **आरोग्य सहाय्यक (पुरुष)** या संवर्गातील खालील कर्मचारी यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत **६ वे वेतन आयोगानुसार २४ वर्षानंतर वेतन श्रेणी ९३००-३४८००, ग्रेड पे ४२०० व ७ वेतन आयोगानुसार २० वर्षानंतर दुसरा** लाभ **वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर (असुधारित- एस-१३: ३५४००-११२४०० व सुधारित- एस-१४: ३८६००-१२२८००) या** वेतनश्रेणीमध्ये आदेशातील अटी व शर्तीना अधीन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | प्रा.आ.केंद्राचे नांव | सेवेत हजर दिनांक | आ.सहा. पदो. / पहिला लाभ दिनांक | २४ वर्षांच्या / २० वर्षांच्या सेवेनंतर दुसरा लाभ देय दिनांक | देय वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री.गौतम दिगंबर उजागरे (मयत) २०-०४-२०१३ | रुई छत्तीसी, ता.नगर | ०७-०२-१९८८ | ०८-०२-२००० | ०८-०२-२०१२ | आरोग्य पर्यवेक्षक वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० |
| २ | श्री.अभिमन्यु निवृत्ति सोनटक्के | खर्डा, ता.जामखेड | ०२-१२-१९९९ | ०२-१२-२०११ | ०२-१२-२०१९ | आरोग्य पर्यवेक्षक एस-१४ : ३८६००-१२२८०० |
| ३ | श्री.रामनाथ गंगाराम गाडेकर | चापडगांव, ता.शेवगांव | ०१-०४-१९९९ | ११-०८-२०१० | ०१-०४-२०१९ | |

| अ. क्र. | पदाचे नांव | 6 व्या वेतन आयोगातील वेतनबॅण्ड रु. | 7 व्या वेतन आयोगातील वेतनमॅट्रीक्समधील वेतनस्तर रु. | |
|---|---|---|---|---|
| | | | असुधारित | सुधारित (वेतनत्रुटी दुरुस्ती) |
| 1 | आरोग्य पर्यवेक्षक | वेतनबॅण्ड - 9300-34800 ग्रेड पे- 4200 | एस-13: 35400-112400 | एस-14: 38600-122800 |

टिप :- शासन निर्णय दि.०२/०६/२०२५ नुसार सुधारित वेतनश्रेणीचा प्रत्यक्षात लाभ हा दि.०१/०६/२०२५ पासून अनुज्ञेय राहील.

